सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. २० जुलै २०१८.

**भद्रावती नगरपरिषदेसाठी**
**१९ ऑगस्ट रोजी मतदान**

मुंबई, दि. २०: भद्रावती (जि. चंद्रपूर) नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १९ ऑगस्ट २०१८ रोजी मतदान; तर २० ऑगस्ट २०१८ रोजी मतमोजणी होणार आहे. या नगरपरिषदेच्या क्षेत्रात आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे.

भद्रावती नगरपरिषदेची मुदत १ सप्टेंबर २०१८ रोजी संपत आहे. त्यामुळे सदस्यपदांसह अध्यक्षपदासाठीदेखील थेट निवडणूक होईल. नामनिर्देशनपत्रे २६ जुलै ते १ ऑगस्ट २०१८ या कालावधीत स्वीकारली जातील. सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येणार नाहीत. नामनिर्देशनपत्रांची छाननी २ ऑगस्ट २०१८ रोजी होईल. अपील नसलेल्या ठिकाणी ८ ऑगस्ट २०१८ रोजी नामनिर्देशनपत्रे मागे घेता येईल. अपील असलेल्या ठिकाणी अपीलाच्या निर्णयानंतर तिसऱ्या दिवसापर्यंत नामनिर्देशनपत्रे मागे घेता येतील. मतदान १९ ऑगस्ट २०१८ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या कालावधीत होईल. मतमोजणी २० ऑगस्ट २०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता सुरू होईल, असे आयोगाच्या प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे.

०-०-०

(Jagdish More, PRO, SEC)